Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 712 – 717

DOI: 10.5281/zenodo.10279343

Original Research Article

# भारतीय तत्त्वज्ञ : महात्मा गांधीं

प्रा. संजय शामराव वाघमारे

ग्रंथपाल, कै. बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय हिंगोली महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sanjaywaghmare121@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रास्ताविक

महात्मा गांधी हे परंपरागत विचारसरणीचे तत्त्वज्ञ असण्याऐवजी आधुनिक विचारसरणीचे तत्त्वज्ञ होते. कारण हे असे पहिले भारतीय होते की ज्यांनी प्रथम स्वतंत्र भारताचा विचार केला. लंडनमध्ये ते जेव्हा अभ्यास करत होते आणि कायद्याचे विद्यार्थी होते तेव्हापासून ते स्वतंत्र भारताचा विचार करीत होते. त्यानंतर त्यांनी या बाबतीत दक्षिण आफ्रिकेत चळवळ सुरू केली होती. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या विरुद्ध केलेला भारतातील लढा त्यांनी जिंकला.

## शिक्षणाची ध्येये आणि आदर्श

मूलांचा विकास करणे शिक्षणाच्या ध्येयाविषयी दृष्टिकोनाचे करण करताना महात्मा महात्मा गांधींनी असे सांगितले आहे. "शिक्षण पाया अर्थ माझ्या मते बालकातील आणि माणसाच्या शरीर पर आणि चैतन्यात जे काही चांगले असेल ते त्याला चारी बाजूनी बाट बहन देणे. साक्षरता हा शिक्षणाचा शेवट नसून ती शिक्षणाची सुरुवातही नाही. पुरुष आणि श्री यांना शिक्षित करण्यासाठी साक्षरता म्हणजे अनेक साधी एक साधन आहे. साक्षरता स्वतःहून शिक्षण नाही."

ब्रिटिश सरकार शिक्षणाचे जे धोरण भारतात राबवीत होते. त्याबाबत गांधीजी हे अत्यंत चिकित्सक होते. त्यांच्या मते शिक्षणाचे ध्येय म्हणजे स्वतःचे संरक्षण करणे होय आणि शिक्षणाच्या योगे प्रत्येक मुलगा आणि मुलगी यांच्यात स्वतःवर अवलंबून राहण्याच्या क्षमतेचा विकास झाला पाहिजे. स्वतःची उपजीविका प्राप्त करण्याची क्षमता म्हणजे स्वतंत्रता आणि स्वाधीनता यांचा एक भाग होय, ते स्वतः या बाबतीत म्हणतात, “शिक्षण हे बेरोजगारीच्या विरुद्ध एका प्रकारची खात्री असणे आवश्यक आहे." म्हणून त्यांच्या मूलभूत शिक्षणाच्या योजनेत व्यावसायिक प्रशिक्षणावर भर

देण्यात आला. हे मूलभूत शिक्षण बालकाला त्याच्या प्रत्यक्ष जीवनाची जाणीव करण्याच्या दृष्टीने दिले जावे हा त्याचा मूळ उद्देश होता. त्यांना शिक्षकांनी आदर्श नागरिक निर्माण करण्याचे साधन व्हावे अशी इच्छा होती. देशातील तीव्र गरिबी पाहिल्यानंतर त्यांनी असे सुचविले की भारतातील शिक्षणाचा आधार व्यावसायिक प्रशिक्षण, हस्तकौशल्य आणि हस्तकला यांचा विकास करावा.

**चारित्र्य निर्माण**

रूसोप्रमाणेच गांधीजींचा विश्वास बालककेंद्रित शिक्षणावर होता. त्यांनी लोकांना प्रभावित करण्यासाठी असा विचार पुढे मांडला की शिक्षणाचे सांस्कृतिक अंग त्याच्या साहित्यिक अंगापेक्षा खूप महत्त्वाचे आहे आणि शिक्षणाच्या सांस्कृतिक अंगाच्या माध्यमातून बालकाची वर्तणूक आणि कल्पना शिकविल्या जातात आणि त्याचे चारित्र्य आणि कल्पना यांचा विकास होतो. त्यांनी असे सांगितले, "खरे शिक्षण म्हणजे बालकातील चैतन्य, बुद्धिमत्ता आणि शारीरिक क्षमतांना वाट करून देणे आणि त्याच्यात उत्तेजना निर्माण करणे होय." म्हणून शिक्षणाचे ध्येय म्हणजे बालकाचा संपूर्ण विकास, त्याच्या शारीरिक, मानसिक आणि चैतन्ययुक्तविकास होय.

महात्याची अधिक महत्वाची आहे. एकाउन्न विचारण्यात आला होता की देशाने स्वतंत्रता प्राप्त केल्यानंतर काय असेल त्यांनी कोणत्याही प्रकारचा संकोच न करता लेकीने शिक्षणाची रचना अशा रीतीने केली जाईल की त्यामुळे लोकांच्या चारित्र्याचा विकास होईल आणि चारित्र्य म्हागजे विचार, शब्द आणि कृती, अहिंसा आणि सत्य यांचा विकास होय. त्यांच्यापूर्वीच्या अनेकांप्रमाणेच यांच्या मते सत्यम हे विद्यार्थ्यांचे आवश्यक हत्यार होय. ते प्राचीन भारतीय शिकांच्या आदर्शाचा पुरावा करणारे होते. वास्तविक पाहता त्यांनी शिकणारा आणि बालब्रह्मचारी हे दोन्ही शब्द समानार्थी होते. म्हणून त्यांच्या मते अभाव हा करवातीचा सातत्याने केलेला प्रयत्न होय. ४. संपूर्ण विकास : उपर्युक्त विवेचनावरून हे स्पष्ट होते की गांधीजी शिक्षणाकडे परिर्मारोतीने किंवा बुक मनाच्या दृष्टिकोनातून पाहत होते. बालकाच्या व्यक्ताच्या केवळ एकाच अंगाने विकास करणारे शिक्षण त्यांनी संकुचित व एकदेशिक म्हणून संबोधले आहे. अशा प्रकारचे शिक्षण हे आपल्या संस्कृतीसाठी शाप आहे. शिक्षणाने केवळ व्यक्तीला स्वतःचे ज्ञान करून देण्याबाबत मार्गदर्शनच करावे असे नाही, तर चांगला व जबाबदार नागरिक बनण्यासाठी आवश्यक क्षमता त्याच्या अंगामध्ये विवविणे हे आहे. गांधीजींनी शिक्षणाची तात्कालिक आणि दीर्घकालीन ध्येये यांच्यातील फरक स्पष्ट केला. त्यांनी असे सुचविले की गुणवत्ता प्रमाणपत्रके आणि पदवीपत्रके उपजीविकेसाठी प्राप्त करणे हे शिक्षणाचे तात्कालिक ध्येय होय. परंतु शिक्षणाचे ऑतिम ध्येय हे फक्त आत्मज्ञान प्राप्त करणे हेच आहे. त्यांनी स्वतः सांगितल्याप्रमाणे, "मी वैयक्तिक स्वातंत्र्याचे मूल्य जाणतो. परंतु तुम्ही हे विसरता कामा नये की मनुष्य हा प्रथम सामाजिक प्राणी आहे. व्यक्तीने त्यांचा हा दर्जा स्वतःचे व्यक्तिमत्त्व सामाजिक प्रगतीच्या आवश्यकतांशी जुळवून घेण्याचे प्राप्त केलेले आहे."

त्यांचा धर्मविषयक विश्वास हा त्यांच्या उदारमतवादी शिक्षणाचा पाया होता. चांगल्याची जाणीव ही वास्तविक पाहता सर्व मानवी कृतींचा अंत किंवा ध्येय आहे आणि ती म्हणजे मानवतेची सेवा करण्याची उत्कृष्ट साधने होत. हे

स्वाभाविक आहे की अशा प्रकारचा विश्वास मानवाला ताण व व्यक्तिगत व खाजगी शिक्षणापेक्षा शिक्षणाच्या सामाजिक उद्दिष्टांच्याकडे घेऊन जातो.

**व्यक्ती आणि सामाजिक ध्येय यांची एकरूपता**

अशा प्रकारे गांधीजींनी शिक्षणाची वैयक्तिक आणि सामाजिक ध्येये यांचे एकात्मीकरण केले. त्यांनी शिक्षण कोणत्याही एका ध्येयाच्या संपादनाशी मर्यादित केले नाही. त्यांनी शिक्षणाची प्रक्रिया वेगवेगळया दृष्टिकोनांतून पाहिली. म्हणून त्यांनी वेगवेगळया कालावधीसाठी शिक्षणाची वेगवेगळी ध्येये पुरस्कृत केली. इतकी की त्यांच्याकडे आपापसातील विरोध आणि स्वतःला पराभूत करणारे अशा दृष्टीनेसुद्धा पाहण्यात येऊ लागले. गांधीजींच्या या सर्व विधानांचे बारकाईने निरीक्षण केल्यानंतर असे वाटते की शिक्षणासंबंधीची ही ध्येये एकमेकास पूरक आहेत.

**सर्वांगीण विकास**

शिक्षणाच्या इतिहासात वेगवेगळ्या शिक्षणवेत्त्यांनी शिक्षणाचे आदर्श वेगवेगळया रीतीने वचनबद्ध केले आहेत. बहुतांश शिक्षणवेत्त्यांना असे वाटते की शिक्षणाचे ध्येय हे व्यक्तिविकासाचा आंतरिक भाग असावा. हेच गांधीजीनी वर्णन केलेले शिक्षणाचे आदर्श स्वरूप होय. विवेकानंदांप्रमाणेच गांधीजी अशा मताचे होते की चारित्र्यघडण आणि हस्तकौशल्य तेवढ्याच प्रमाणामध्ये महत्त्वाची आहेत. एका बाजूने त्यांना बालक शिकत असतानाच त्यांनी पैसे मिळवावे असे वाटत होते आणि दुसऱ्या बाजूला त्यांना बालकाने आपल्या चारित्र्याचा विकास करावा असेही वाटत होते. त्यांच्या मते व्यक्तीच्या सांस्कृतिक विकासाचा निकष म्हणजे ज्ञानाची खोली नसून अंतर्गत विकास होय. संस्कृती म्हणजे त्यांच्या मते मानवी मनाचे अंग नसून ते त्याच्या आत्म्याचे वैशिष्ट्य आहे. अशा प्रकारच्या संस्कृतीचा विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय होते. गांधीजींनी शिक्षणाची योजना अशा रीतीने केली की त्यामुळे त्यांनी शिक्षणाच्या सर्व प्रकारावर शारीरिक, मानसिक, नैतिक, सौंदर्यविषयक आणि धार्मिक भर दिला.

**आत्मनिर्भरता**

यापूर्वी दाखवून दिल्याप्रमाणे गांधीजींचे ध्येय शिक्षणाच्या माध्यमाने स्वावलंबी होणे हे होते आणि म्हणून त्यांनी हस्तकलाकेंद्रित शिक्षणाचा विचार केला. त्यांनी मूलभूत शिक्षणाची योजना समजावून सांगताना असे विधान केले की भारतातील बेरोजगारीच्या विरुद्ध ते संरक्षण आहे. गांधीजी म्हणाले, “चौदाव्या वर्षी बालकाने सात वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर बालक हे पैसे मिळविणारे एकक व्हावे. सध्या सुद्धा गरीब माणसांची बालके आपाततः त्यांच्या पालकांच्या कामात त्यांना मदत करतात. यामागे त्यांची अशी भावना असते की ते माणसाला जे खाण्यास देतात ते जर मी काम केले नाही तर मला कसे प्राप्त होणार? असे असताना सुद्धा राज्य अशा बालकाला सातव्या वर्षी स्वतः अधिकाराखाली घेते आणि त्याच्याकडे पैसे मिळविणारे एकक म्हणून सोपविले. एका बाजूने तुम्ही शिक्षण प्रदान करता आणि त्याच बरोबर बेरोजगारीचे कापून टाकला." शिक्षणाच्या या योजनेची शिफारस राष्ट्रीय शैक्षणिक म्हणजेच कोठारी आयोगाने केलेली आहे. आयोगाने अशी शिफारस केली आहे की कार्यानुभव हा शिक्षणाचा सर्वसामान्य आणि व्यावसायिक

अंतर्गत हिप्सा असावा. "आम्ही कार्यानुभवाची व्याख्या पुढीलप्रमाणे करतो, शाळा, घर, वर्कशॉप, शेत, कारखाना किंवा इतर कोणत्याही संपादनाच्या परिस्थितीत असलेल्या ठिकाणी संपादनात्मक कामात हिस्सा घेणे होय."

**लोकशाही आदर्श**

त्यांच्या समकालीन भारतीय शिक्षण शास्त्रज्ञांच्या प्रमाणेच गांधीजींच्या दृष्टीनेसुद्धा शिक्षणाच्या माध्यमातून लोकशाही आदर्शाच्या ध्येयांची उत्क्रांती व्हावी, त्यांच्या शिक्षणाची मूलभूत योजना ही वस्तुस्थिती स्पष्ट करते, त्यांच्या मते शिक्षणाचे ध्येय आदर्श नागरिकत्व निर्माण करणे हे असावे, त्यांच्या मते शिक्षणाने बालकांना लोकशाहीप्रधान समाजाचे आदर्श सभासद बनवावे. गांधीजींच्या मते शाळा हा असा समाज आहे की ज्यामध्ये बालकांना लोकशाही मूल्यांचा विस्तृत दृष्टिकोन, सहनशीलता, चांगले शेजारी यांच्या नीतिमूल्यांचे शिक्षण दिले जाते. शाळा ही अशी समाजाची लघुप्रतिमा आहे ज्यामध्ये बालके सहानुभूती, सेवा, प्रेम, बंधुता, समानता, स्वातंत्र्य इत्यादी सद्‌गुण शिकतात.

उपर्युक्त गुणवत्ता एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे शाळेमार्फत संक्रमित केल्या जातात, व्यक्ती आणि देश यांचे कल्याण हे एकमेकांशी पूरक असते. म्हणून जर देशाची प्रगती करावयाची असेल तर भविष्यकालीन पिढीने लोकशाही नागरिकत्वाचे सद्‌गुण विकसित करावयास पाहिजेत.

गांधीजींनी सांगितल्याप्रमाणे, “कोणत्याही देशाची प्रगती त्याच्यातील घटकाशिवाय होऊ शकत नाही आणि त्याचप्रमाणे कोणतीही व्यक्ती ती राहत असलेल्या देशाची प्रगती झाल्याशिवाय स्वत:ची प्रगती करू शकत नाही. कारण व्यक्ती ही देशाचा एक हिस्सा असते."

**नैतिक आणि आध्यात्मिक**

चांगले चारित्र्य असल्याशिवाय ज्ञान हे टाकाऊ आहे असे प्रतिपादन त्यांनी विविध संस्थांतील विद्यार्थ्यांसमोर केलेल्या भाषणात केले आहे. गांधीजींनी शिक्षणाच्या नैतिक आणि आध्यात्मिक ध्येयांवर भर दिला. शिक्षणाच्या नैतिक ध्येयांवर भर देताना गांधीजी असे म्हणाले की, "ज्ञानाच्या शेवटापासून चारित्र्य घडणाची सुरुवात व्हावी.” चारित्र्यघडण हे शिक्षणाचे नैतिक आदर्श होय. गांधीजींच्या मतानुसार तो मानवाच्या जीवनातील सर्वांत महत्वाचा भाग होय. या बाबतीतील त्यांची ध्येये प्राचीन भारतीय विचारक तसेच समकालीन इमर्सन आणि रस्किन इत्यादी पाश्चात्य विचारकांप्रमाणेच होते. गांधीजींनी भारतीय शिक्षणाची गुरुकुल पद्धत आणि ब्रह्मचार्याचा आदर्श यांची खूप स्तुती केली आहे. प्राचीन भारतीय आदर्शानुसार शिक्षणाचे ध्येय मुक्तता आहे. हेच ध्येय गांधीजी १९२९ साली स्थापन केलेल्या गुजरात विद्यापीठाचे आहे.

गांधीजींनी मुक्ततेची व्याख्या खूप विस्तृत अर्थाने केलेली आहे. त्यात राजकीय. सामाजिक, आर्थिक तसेच समाजाच्या सर्व सभासदांच्या मुक्ततेचा समावेश असावा. खरे स्वातंत्र्य म्हणजे आध्यात्मिक स्वातंत्र्य असते. हे स्वातंत्र्य प्राप्त करणे हे शिक्षणाचे काम आहे. बौद्धिक, आर्थिक आणि राजकीय उत्कर्ष समान पातळीवर करणे ही शिक्षणाची ध्येये

होत. तरी सुद्धा त्याचे प्रमुख ध्येय नैतिक व आध्यात्मिक विकास करणे होय. विद्यार्थ्यात असलेल्या विस्तृत बेशिस्तीचा निषेध करताना गांधीजींनी त्यांना ब्रह्मचर्याचा आदर्श पालन करण्यास सांगितले.

**देवत्वाची जाणीव**

भारतीय तत्त्वज्ञानानुसार ज्ञानाचा शेवट म्हणजे देवत्वाची जाणीव होणे. ही देवत्वाची जाणीव म्हणजेच स्वतःची जाणीव होय. ही जाणीव करून देणे हा शिक्षणाचा आदर्श पाश्चात्त्य आणि पौर्वात्य बहुतेक शैक्षणिक तत्त्वज्ञांनुसार मानला गेला आहे. या प्रकारच्या विचारसरणीशी सहमत होत गांधीजींनी असे प्रतिपादन केले की विद्यार्थ्याने संन्याशाचे जीवन जगावे. शिक्षणाचा हा आध्यात्मिक आदर्श ऐहिक किंवा तात्कालिक आदर्शांना नकार देत नाही. गांधीजींच्या शब्दांत सांगायचे झाले तर, "आत्मप्रचिती हाच मुळी सर्वांगपरिपूर्ण आदर्श होय. या आदर्शात शिक्षणाच्या इतर आदर्शाचा समावेश होतो.

अरविंदबाबूंच्याप्रमाणे गांधीजींचा शिक्षणाच्या अंतिम आध्यात्मिक ध्येयावर विश्वास होता. आध्यात्मिक विकासात शारीरिक आणि मानसिक तसेच वैयक्तिक आणि सामाजिक विकासाचा समावेश होतो. या बाबतीत त्यांचे एकमत होते. अशा प्रकारे त्यांनी शिक्षणाच्या विविध आदर्शाचे एकात्मीकरण केले. त्यांच्या मूलोद्योग शिक्षण पद्धतीत शिक्षणाची योजना प्रचलित भारतीय समाजाला पूरक असावी अश रीतीने केली. त्यांनी प्रचलित भारतीय शिक्षणातील अडचणींवर विचार केला आणि शिक्षणाच्या माध्यमातून ते प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञा- हे प्राचीन भारतीय आदर्शवादावर आधारित आहे. त्यांनी जरी शारीरिक शिक्षणाच्य व्याप्तीवर मर्यादा पातली नाही तरी सुद्धा त्यांचे महत्त्वाचे लक्ष आध्यात्मिक वाडीवर केंद्रीभूत होते.

**सर्वोदयासाठी शिक्षण**

गांधीजींना देशाच्या गरजांबाबत खूप जाणीव होती. म्हणून त्यांना असा विश्वास होता की मूलोद्योगी शिक्षणच देशाला यशाकडे नेईल. त्यांच्या भारतीय शिक्षणाच्या योजनातील प्रमुख ध्येय देशाच्या गरजा भागविणे हे होते. भारत हा खेडेगावांचा देश आहे. भारतातील बहुसंख्य ग्रामवासीयांच्या मध्ये त्यांच्या बालकांच्या शिक्षणासाठी खर्च करण्याची कुवत नाही. या व्यतिरिक्त त्यांना त्यांच्या व्यवसायात त्यांच्या बालकांची मदत हवी असते. म्हणून गांधीजींनी मूलभूत शिक्षणाची योजना केली म्हणजे बालकांचे शिक्षण त्यांच्या पालकांना भारभूत होणार नाही आणि त्या शिक्षणाच्या माध्यमातून बालकांना स्वतः त्यांच्या शिक्षणाचा खर्च मिळविण्याची कुवत निर्माण होईल.

गांधीजींनी श्रम आणि हस्तकौशल्य यांच्या प्रतिष्ठेच्या महत्त्वावर भर दिला. त्यांना याची खात्री होती की प्रचलित शिक्षण तरुणांना कारकुनी रोजगार प्राप्त करण्यास पुरेसे असले तरी शेतकरी समाजासाठी ते अजिबात सुयोग्य नाही. म्हणूनच त्यांनी त्यांच्या मूलभूत शिक्षणात हस्तकला शिकण्यावर भर दिला. गांधीजींचा असा आदर्शवादी दृष्टिकोन असताना सुद्धा तो सर्वत्र व्यावहारिक होता.

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये गांधीजी प्रयोगवादी होते. त्यांच्या मूलोद्योगी शिक्षणाची योजना तयार करताना त्यांनी त्याच्या विविध अंगांवर प्रयोग केले. त्यांच्या मते मानवी सत्ये ही परिस्थितिसापेक्ष असतात. परमेश्वरच फक्त नित्य आणि स्थिर असतो म्हणून त्यांनी बालकाच्या शिक्षणासाठी पुरस्कृत करण्यापूर्वी प्रत्येकाची चाचणी घेतली. त्यांनी असे मत पुढे मांडले की बालकाने स्वतः भोवतालच्या पर्यावरणातून ज्ञान प्राप्त करावे आणि त्याचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग करावा. इतर व्यवहारवादी आणि साधनवाद्यांप्रमाणेच गांधीजींनी विद्यार्थ्यांची आवड, श्रम करायची तयारी आणि विद्यार्थ्याला शिकविण्यात येणाऱ्या विषयातील विविधता यांच्या महत्त्वावर भर दिला.

**सर्वोदय समाज**

महात्मा गांधींच्या सामाजिक तत्त्वज्ञानास सर्वोदय असे म्हणता येईल. त्यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचा सर्वोदय पाया होय. सर्वोदयाचे ध्येय जात, पंथ, लिंग आणि राष्ट्रीयत्व यांचा विचार न करता सर्वांगीण विकास करणे हे होय. गांधीजींनी भारतात लोककल्याणकारी राज्याची स्थापना करावयाची होती.